# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- संसदेचं पावसाळी अधिवेशन अनिश्चित काळासाठी तहकूब-जया बच्चन यांच्याविरोधात निंदा प्रस्ताव
- वक्फ सुधारणा विधेयकासंदर्भात संयुक्त संसदीय समिती स्थापन-लोकसभेचे २१ तर राज्यसभेच्या दहा सदस्यांचा समावेश
- जागतिक आदिवासी दिन विविध कार्यक्रमांनी साजरा-हर घर तिरंगा अभियानालाही प्रारंभ

आणि

- आयसिस संबंधित दहशतवाद्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाकडून पुण्यातून अटक

****

आता सविस्तर बातम्या

****

संसदेचं पावसाळी अधिवेशन आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं. लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदनाच्या तहकुबीची घोषणा केली. या अधिवेशनात लोकसभेत ११५ तास तर राज्यसभेत ९० तास कामकाज झालं. लोकसभेत एकूण १२ विधेयकं सादर झाली, यापैकी वित्त विधेयक तसंच वायूयान विधेयकासह चार विधेयकं सदनानं मंजूर केली. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत रेल्वे दुरुस्ती विधेयक २०२४ आज सादर केलं.

राज्यसभेत सभापती जगदीप धनखड यांनी कामकाज तहकुबीची घोषणा करतांना, विरोधकांनी आपल्या कृतीचं आत्मपरीक्षण करावं, तसंच सदनाचे सदस्य असलेल्या सर्वांनी आपल्या कर्तव्याच्या शपथेची जाणीव ठेवावी, असं आवाहन केलं.
दरम्यान, आज राज्यसभेत समाजवादी पार्टीच्या खासदार जया बच्चन यांनी सभापतींबाबत केलेल्या आक्षेपार्ह टीकेबद्दल निंदा प्रस्ताव सादर करण्यात आला. सभागृह नेता जे पी नड्डा यांनी हा प्रस्ताव सादर करतांना, जया बच्चन यांचं विधान सभापती पदाची मर्यादा हनन करणारं असल्याचं सांगितलं. आज सदनात शून्यकाळ पूर्ण होताच, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्याबाबत भाजपचे घनश्याम तिवारी यांनी केलेल्या टीकेवर सभापती बोलत असतांना, जया बच्चन यांनी आक्षेपार्ह विधान केलं. त्यावरून सदनात गदारोळ झाला. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला. त्यानंतर कामकाज तीन वेळा तहकूब होऊन अखेरीस अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

****

वक्फ सुधारणा विधेयकाच्या समीक्षेसाठी संयुक्त संसदीय समितीच्या सदस्यांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये लोकसभेतल्या जगदंबिका पाल, निशिकांत दुबे, इमरान मसूद, असदउद्दीन ओवेसी, यांच्यासह एकूण २१ सदस्य तर राज्यसभेच्या गुलाम अली, डॉ सय्यद नसीर हुसैन, डॉ मेधा कुलकर्णी यांच्यासह दहा सदस्यांचा समावेश आहे. ही समिती लोकसभेच्या आगामी सत्राच्या पहिल्या आठवड्याच्या अखेरीस आपला अहवाल सादर करणार आहे.

****

आपल्याला मुख्य प्रवाहात यायच असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, चांगल्या शिक्षणासाठी आदिवासी विकास विभाग सर्वोत्तपरी प्रयत्न करत असल्याचं, आदिवासी विकास मंत्री डॉ विजयकुमार गावित यांनी म्हटलं आहे. जागतिक आदिवासी दिनानिमित्त नंदुरबार इथं राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्यात आला, यावेळी गावित बोलत होते. आश्रमशाळांमधून दर्जेदार शिक्षणासोबतच स्वयंम योजनेतून तालुका स्तरावर निधी सुद्धा देण्यात येणार असं गावित यांनी सांगितलं. सहा महिन्यात राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या सर्व शासकीय आश्रमशाळा डिजीटल होतील, असं आश्वासन गावित यांनी यावेळी दिलं.

****

नागपूर इथं अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने गुणगौरव सोहळा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. आदिवासी विकास विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य शाळा, शासकीय वसतिगृह आणि नामांकित शाळेतील वर्ग दहावी आणि बारावीतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस वितरण करण्यात आलं.

****

आदिवासी दिनानिमित्त गोंदिया जिल्हयात आदिवासी बांधवांच्या वतीने आदिवासी पोशाख परिधान करून गोंडी नृत्य करण्यात आलं. जिल्ह्यातील आदिवासी बांधव गोंदिया शहरात आपला पारंपरिक पोशाख परिधान करून सहभागी झाले होते. शहरात निघालेल्या मिरवणुकीत आदिवासी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

****

गडचिरोली जिल्ह्यात विविध सामाजिक संघटनांच्या वतीने विविध कार्यक्रम घेण्यात आले. अहेरी तालुक्यातल्या चेरपल्ली इथं अन्न आणि औषध प्रशासनमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या हस्ते आदिवासी भवनाचं लोकार्पण करण्यात आलं. देसाईगंज इथं क्रांतिसूर्य बिरसा मुंडा समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

****

हिंगोली शहरातल्या क्रांतीसूर्य बिरसा मुंडा चौकात जागतिक आदिवासी दिनानिमित्त बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. माजी आमदार संतोष टारफे यांच्यासह मोठ्या संखेने आदिवासी समाज बांधव यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांसाठी हिंगोली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. आदिवासी विशेष पद भरती तात्काळ करण्यात यावी, अधिसंख्य केलेले रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत, नवीन राशन कार्ड धारकांना धान्य उपलब्ध करून द्यावं, शासकीय आश्रम शाळेत वाढीव वर्ग तुकडीला मान्यता देण्यात यावी आदी मागण्याचं निवेदन सादर करण्यात आलं.

****

राज्यात रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या बंदरांचा विकाससंदर्भात मुंबईतले शिवसेनेचे खासदार रविंद्र वायकर यांनी आज केंद्रीय जल वाहतूक मंत्री सर्बानंद सोनोवाल यांची संसदेत भेट घेऊन निवेदन दिलं. रत्नागिरी जिल्ह्यातल्या रत्नागिरी, दापोली, गुहागर, अलिबाग तर सिंधुदुर्ग या जिल्ह्यातल्या बंदरांची देखभाल दुरुस्ती करण्याची आवश्यकता वायकर यांनी या निवेदनात नमूद केली आहे.

****

राज्यात अनेक ठिकाणी आज नागपंचमीचा सण उत्साहात साजरा झाला. महिला वर्गानं पारंपरिक पद्धतीनं नागपूजा केल्याचं चित्र राज्यभरात पहायला मिळालं. निसर्गातले सर्वच साप विषारी नसून, सापांविषयी समाजामध्ये पसरलेल्या विविध गैरसमजांबाबत, सर्पमित्र संघटनांच्या वतीनं आज जनजागृतीपर कार्यक्रमही घेण्यात आले.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड इथं नागपंचमीच्या दिवशी नागेश्वराची यात्रा भरते. या निमित्ताने जामखेड शहर गजबजून गेले आहे. या निमित्ताने धाराशिव, बीड, अहमदनगर या जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने या यात्रेस हजेरी लावतात.

****

हर घर तिरंगा अभियान आजपासून सुरु झालं. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. घरोघरी तिरंगा अभियान हे देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग आणि बलिदानाची आपल्याला सतत जाणीव करून देईल, या अभियानानं आता लोकचळवळीच स्वरूप घेतल असून यावर्षीही राज्यातल्या अडीच कोटी घरावर तिरंगा फडकवला जाणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी आज ऑगस्ट क्रांतिदिनी मुंबईतल्या ऐतिहासिक ऑगस्ट क्रांती मैदानात हुतात्मा स्मृती स्तंभावर अभिवादन केलं. यावेळी त्यांनी पदयात्रा आणि सायक्लोथॉनला हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ केला. यानंतर मुख्यमंत्र्यांनी तिरंगा कॅनव्हास वर स्वाक्षरी केली, तसंच घरोघरी तिरंगा अभियानाच्या सेल्फी पॉईंटवर सेल्फी घेतला.

दरम्यान, हर घर तिरंगा अभियानानिमित्त आज लातूर, बीड तसंच कोल्हापूर इथं तिरंगा रॅली काढण्यात आली.

लातूर इथं ‘तिरंगा यात्रे’ने या अभियानाला सुरूवात झाली. यंदा प्रत्येक घरी ध्वजारोहणाचा मान कुटुंबातील महिला सदस्यांना देवून लातूरचा आगळा- वेगळा

पॅटर्न तयार करावा, असं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी केलं आहे. या अभियानामध्ये विविध उपक्रमांचं आयोजन केलं जाणार असून लातूर जिल्हावासियांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचं आवाहन ठाकूर-घुगे यांनी केलं आहे.

****

नांदेड महापालिकेच्या वतीने आज सकाळी तिरंगा फेरी काढत हर घर तिरंगा मोहिमची सुरुवात झाली. यावेळी महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी तिरंगा प्रतिज्ञा घेतली. अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांनी राष्ट्रध्वजास समर्पित दुचाकी फेरीस हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली.

****

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचे संस्कार रुजवण्यासाठी सर्व शाळा महाविद्यालयांनी 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी व्हावं, असं आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केलं आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात आज महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येक महाविद्यालयामध्ये युवासंवाद, मतदार नोंदणी आणि जाणीवजागृती अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून हर घर तिरंगा कार्यक्रम साजरा करावा, असं स्वामी म्हणाले.

****

दरम्यान, छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीने आज ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त शहरातल्या महापुरुषांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं.

****

आयसिसशी संबंधित दहशतवाद्याला दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं आज पुण्यातून अटक केली. रिजवान आली असं त्याचं नाव असून तो दर्यागंजचा रहिवासी आहे. राष्ट्रीय तपास संस्था - एनआयएनं त्याच्यावर तीन लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं होतं.

****

कोल्हापूर इथलं ऐतिहासिक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह काल रात्री आग लागून भस्मसात झालं. केशवराव भोसले यांची आज १३४ वी जयंती आहे, या दिवसाच्या पूर्वसंध्येलाच अशी घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी आज दुर्घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. राजर्षी शाहू महाराजांनी बांधलेलं हे नाट्यगृह म्हणजे कोल्हापूरचा सांस्कृतिक ठेवा आहे असं सांगून या नाट्यगृहाच्या बांधणीसाठी आणि त्याला पूर्वीचं वैभव प्राप्त करुन देण्यासाठी शासनस्तरावर निधी मिळवण्याचा प्रयत्न करु, असंही मुश्रीफ यांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्यात उदगीर इथल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचं आज क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते उद्घाटन झालं. या कार्यालयामुळे सर्वसामान्य नागरिक, वाहनधारकांना परिवहन विभागाच्या सर्व सेवा उदगीर इथं उपलब्ध होणार असल्याने त्यांची गैरसोय दूर होईल, असा विश्वास बनसोडे यांनी व्यक्त केला.

****